महाराष्ट्र शासन
गृह विभाग
कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुनर्वसन
फोन क्र : (०२०) २६१२३५६३
फॅक्सक्र: (०२०) २६१२५८७८
Email-igoffice.ddo-mh@gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

---

**परिपत्रक**

जा.क्रं.अपोमसंवकामनि/लेखा/ कुकनि-क्रिडा निधी/ 115 /२०२५,कक्ष-५, दिनांक-03 /०१/२०२५

विषय- कुटुंब कल्याण व क्रिडा निधीत जमा झालेली रक्कम दरमहा पाठविणे बाबत

संदर्भ-1.दिनांक-03.12.2024 रोजी मध्यवर्ती समितीच्या बैठकीतील निर्णय

2.या कक्षाचे परिपत्रक क्रमांक-504/2022 दिनांक-19.01.2022

3.या कक्षांचे परिपत्रक क्रमांक-516/2023 दिनांक-19.01.2023

4.या कक्षांचे परिपत्रक क्रमांक-10184/2024 दिनांक- 06 .12.2024

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्रमांक-02 अन्वये सर्व प्रादेशिक कार्यालयांनी रु 10,000/-(दहा हजार) सर्व मध्यवर्ती कारागृह यांनी रु-50,000/-(पन्नास हजार) व सर्व जिल्हा कारागृह यांनी रु-25,000/-(पंचविस हजार) इतकीच रक्कम कार्यालयाच्या कुंटुंब कल्याण निधीमध्ये शिल्लक ठेवुन उर्वरित रक्कम व दरमहा जमा होणारी रक्कम मुख्यालयास ५ तारखेपर्यंत पाठविणे बाबत कळविण्यात आले आहे.अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनातुन कपात करण्यात आलेला कुटुंब कल्याण व क्रिडा निधी मुख्यालयास पाठविणेबाबत अनेक कारागृहा कडुन अनियमितता दिसुन आली आहे.

संदर्भीय पत्र क्रमांक-03 व 04 अन्वये सर्व कार्यालय प्रमुखांनी परिपत्रकात नमुद केलेल्या रक्कमे प्रमाणे निधी कपात करुन त्यांचे कार्यालयाकडे जमा होणारा कुटुंब कल्याण व क्रिडा निधी खालील दिलेल्या विहित नमुन्यात सादर करावा.तसेच कुटुंब कल्याण व क्रिडा निधीचे स्वतंत्र धनादेशा सोबत कार्यालयात / कारागृहात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची यादी पाठविण्यात यावी.

कारागृहाचे नाव-

| अ.क्र | पदनाम | मंजुर पदे | कार्यरत पदे | सन-2023 च्या परिपत्रकानुसार कुकनि निधी | 01 जानेवारी 2025 पासुन सुधारित क्रिडा निधी | एकुण जमा रक्कम | शेरा (वर्गणी कपात न करण्याचे कारण) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | अधिकारी वर्ग-अ **(राजपत्रित)** | | | | | | |
| 02 | अधिकारी वर्ग-ब **(अराजपत्रित)** | | | | | | |
| 03 | कारागृह अधिकारी वर्ग-क **(अराजपत्रित)** | | | | | | |
| 04 | कारागृह कर्मचारी वर्ग-ड | | | | | | |

3/1/25

**(प्रशांत बुरडे)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

**प्रति,**

1.विशेष पोलीस महानिरीक्षक (का) छ.संभाजीनगर / नाशिक विभाग,नाशिक
2.कारागृह उपमहानिरीक्षक,पश्चिम विभाग,पुणे/ पुर्व विभाग,नागपुर/ दक्षिण विभाग,मुंबई
3.कारागृह अधीक्षक (सर्व) मध्यवर्ती / जिल्हा / खुले कारागृह / रत्नागिरी विशेष कारागृह / स्वतंत्रपुर खुली वसाहत
4.सर्व कक्ष अधिकारी ,अपोमस व कामनि कार्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-01

महाराष्ट्र शासन
कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुनर्वसन
Tel.No. : (020)26124815
Fax No. : (020)26125878
Email ID : igoffice.ddo-mh@gov.in
Website : www.mahaprisons.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

परिपत्रक

जा. क्र. लेखा विभाग/कुकनिधी वसूली/ ५०४ /२०२२, कक्ष-५, दि.१९/०१/२०२२.

**विषयः-** कुटुंब कल्याण निधीत जमा झालेली रक्कम दरमहा पाठविणे बाबत.

**संदर्भः-** (१) मुख्यालयाचे परिपत्रक जा.क्र.अपोमसंवकामनि/पुणे/क-५/कुकनिवैअग्रिम /वसुली/१२२०, दि.०१.१०.२०१८.

(२) मुख्यालयाचे परिपत्रक जा.क्र.अपोमसंवकामनि/पुणे/क-५/कुकनिवैअग्रिम /वसुली/१४६५, दि.५.१०.२०१६.

मुख्यालयाचे संदर्भीय परिपत्रक क्रमांक-०१ नुसार कुटूंब कल्याण निधीमध्ये **(१)** विशेष पोलीस महानिरीक्षक(कारागृह), दक्षिण विभाग, भायखळा मुंबई/कारागृह उपमहानिरीक्षक, प.विभाग, पुणे/पूर्व विभाग, नागपूर/मध्य विभाग,औरंगाबाद यांनी रु.१०,०००/-(रुपये दहा हजार मात्र) **(२)** मध्यवर्ती कारागृहे **(सर्व)** यांनी यांनी रुपये ५०,०००/-(रुपये पन्नास हजार मात्र) **(३)** जिल्हा कारागृह **(सर्व)**/खुले कारागृह **(सर्व)**/खुली वसाहत, आटपाडी जि.सांगली/किशोर सुधारालय, नाशिक यांनी रुपये २५,०००/-(रुपये पंचवीस हजार मात्र) इतकीच रक्कम आपले कार्यालय स्तरावर कुटूंब कल्याण निधीमध्ये शिल्लक ठेवून नमूद रक्कम वजा जाता मागील शिल्लक असलेली रक्कम व यापुढे **कुटुंब कल्याण निधी** मध्ये दरमहा जमा होणारी संपूर्ण **(१००%)** रक्कम दरमहा ५ तारखेपर्यत मुख्यालयास न चुकता पाठविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

मुख्यालयाचे स्तरावर कुटूंब कल्याण समितीची दि.१८.१०.२०२१ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत कुटूंब कल्याण निधीमध्ये **(अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनातून जमा होणारी वर्गणी/वैद्यकीय कारणास्तव परतावा अग्रिम/ए.टी.एमचे भाडे पोटी/विश्रामगृहाची येणारी भाडे पोटी/लॉनचे भाडे पोटीची रक्कम)** दरमहा जमा होणारी रक्कम दरमहा ५ तारखेपर्यंत मुख्यालयास न चुकता पाठविण्याबाबत समितीने निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे सर्व कार्यालय प्रमुखांनी कार्यवाही करावी.

बँकेचे एटीएम सेंटरचा ठरलेल्या कालावधीचा करार संपल्यानंतर पुढील कालावधीचा करार कारागृह अधीक्षक यांचे स्तरावर करार करण्यात यावा.

सर्व कार्यालय प्रमुखांनी त्यांचे कार्यालयाकडे कुटूंब कल्याण निधीमध्ये वर नमूद केलेल्या रक्कमे व्यतिरिक्त जास्त रक्कम शिल्लक राहणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच मुख्यालयातील लेखा अधिकारी यांनी लेखा परीक्षणाच्यावेळी नमूद केलेल्या रक्कमे व्यतिरिक्त जास्त रक्कम कुटूंब कल्याण निधीमध्ये शिल्लक राहणार नसलेबाबत तपासणी करावी. तरी सदरच्या परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

**(अतुलचंद्र कुलकर्णी)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति,

(१)विशेष पोलीस महानिरीक्षक(कारागृह), दक्षिण विभाग, भायखळा मुंबई
(२)कारागृह उपमहानिरीक्षक, प.विभाग, पुणे/पूर्व विभाग, नागपूर/म.विभाग, औरंगाबाद
(३)प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी, प्रशिक्षण महाविद्यालय, पुणे-६
(४)अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह **(सर्व)** (५)अधीक्षक, जिल्हा कारागृह **(सर्व)**
(६)अधीक्षक, खुले जिल्हा कारागृह**(सर्व)**
(७)प्राचार्य, किशोर सुधारालय, नाशिक
(८)अधीक्षक, रत्नागिरी विशेष कारागृह, रत्नागिरी
(९)अधीक्षक, स्वतंत्रपूर खुली वसाहत,आटपाडी जि. सांगली
(१०) लेखा अधिकारी, अपोमसंवमकावससु, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

सुधारणा व पुनर्वसन
फोन क्र : (०२०) २६१२३५६३
फॅक्सक्र: (०२०) २६१२५८७८
Email-igoffice.ddo-mh@gov.in

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**कारागृह व सुधारसेवा विभाग**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

---

अत्यंत महत्वाचे /परिपत्रक

**जा.क्र.लेखा/कुकनि/वर्गणी-शिष्यवृत्ती/516 /२३, कक्ष-५,पुणे-१दिनांक19 /१/२०२३.**

**विषय:-दि.१७.०१.२०२३ रोजी झालेली बैठक बाबत.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, दिनांक १७.०१.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये खालील प्रमाणे सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले आहेत.

१) **के.के.भवन येथील विश्रामगृह :** के.के.भवन येथील विश्रामगृह करिता पुणे शहारातील हॉटेलकडिल संपर्क क्रमांक स्वागत कक्ष येथे ठेवले जातील अभ्यागताने हॉटेलशी संपर्क करुन नाष्टा/जेवणाची सेवा उपलब्ध करुन घ्यावी.

२) **विभागीय क्रिडा स्पर्धा :** नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या आहे त्यासाठी वाढीव अनुदान रु.५०,०००/- मंजूरी देण्यांत येत आहे.

३) **नागपूर मध्यवर्ती कारागृह येथील विश्रामगृह :** नागपूर मध्यवर्ती कारागृह येथील विश्रागृहाची डागडुगी, रंगरंगोटी व किरकोळ दुरुस्तीसाठी कुटूंब कल्याण निधीतून अनुदान रक्कम रु.२,०५,०००/- मंजूरी देण्यांत येत आहे.

४) **राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धा :** सन २०२२-२३ वर्षातील महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धा आयोजित दि.६.२.२०२३ ते ९/०२/२०२३ पर्यत घेणेस व क्रिडा निधीतून अंदाजित रक्कम रु.५,००,०००/- मंजूरी देण्यांत येत आहे.

५) **सेवानिवृत्ती निरोप समारंभ :** कारागृह अधिकारी/कर्मचारी हे सेवानिवृत्त होताना निरोप समारंभाकरिता खर्च करण्यात येणारी रक्कम रु.२०००/- ऐवजी **रु.५,०००/-** प्रमाणे खर्च करणेत यावी. (कर्मचा-यांकरिता शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह) सदरचे परिपत्रका प्रमाणे माहे जानेवारी २०२३ पासून अंमलबजावणी करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

६) **कुटूंब कल्याण निधी वर्गणी :** (१) महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील कारागृह उपमहानिरीक्षक ते अधीक्षक वर्ग-१ अधिकारी संवर्ग :- रु.६००/- (२) महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील वर्ग-२ संवर्ग :- रु.३५०/ (३) कारागृह विभागातील तुरुंग अधिकारी श्रेणी-१ व तुरुंग अधिकारी श्रेणी-२ संवर्ग :- रु.३००/- (४) कारागृह विभागातील वर्ग-३ कर्मचारी संवर्ग :- रु.२५०/- (५) कारागृह विभागातील वर्ग-४ कर्मचारी संवर्ग :- रु.१००/- **कुटूंब कल्याण निधीच्या सुधारित वाढ केलेल्या मासिक वर्गणीची रक्कम सदरचे परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापासून वसूल करण्यात यावी.**

७) **शैक्षणिक शिष्यवृत्ती व बक्षिस** : सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षाकरिता सुधारीत वाढ करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. **(१) शैक्षणिक शिष्यवृत्ती रु.३०००/- (२) प्राविण्य बक्षिस रु.२०००/-**

( अमिताभ गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

प्रति,

१. कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग,भायखळा,मुंबई.
२. कारागृह उपमहानिरीक्षक,पुर्व विभाग, नागपूर
३. कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग,येरवडा,पुणे
४. कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग,औरंगाबाद.

प्रत पुढील कार्यवाहीसाठी :-

(१) अधीक्षक, मध्यवर्ती/जिल्हा कारागृह (सर्व)
(२) प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,येरवडा,पुणे-६/ किशोर सुधारालय, नाशिक
(३) अधीक्षक,खुले कारागृह (सर्व)
(४) अधीक्षक, रत्नागिरी विशेष कारागृह/स्वतंत्रपुर खुली वसाहत
(५) स्वीय सहाय्यक, अपर पोलीस महासंचालनालय व कारागृह महानिरीक्षणालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-०१

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुनर्वसन
फोन क्र : (०२०) २६१२३५६३
फॅक्सक्र: (०२०) २६१२५८७८
Email-igoffice.ddo-mh@gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

---

परिपत्रक

जा.क्रं.अपोमसंवकामनि/लेखा/शिष्यवृत्ती/10184/२०२४,कक्ष-५, दिनांक-06/१२/२०२४

विषय- 01 जानेवारी -2025 पासुन क्रिडा निधी वर्गणीत वाढ करणेबाबत

संदर्भ-दिनांक-03.12.2024 रोजी मध्यवर्ती समितीच्या बैठकीतील निर्णय

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, दिनांक-03.12.2024 रोजी मध्यवर्ती समितीच्या बैठकीत कारागृह विभागातील अधिकारी / कर्मचारी यांचे जानेवारी -2025 च्या वेतनातुन क्रिडा निधी करिता खालील दर्शविल्या प्रमाणे वाढ करणेबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आलेला आहे.

| अ.क्र | तपशिल | 01 जानेवारी-2025 पासुन वाढ |
|---|---|---|
| 01 | कारागृह अधिकारी वर्ग-01 करिता | रु-150/- |
| 02 | कारागृह अधिकारी वर्ग-02 व वर्ग-03 करिता | रु-100/- |
| 03 | कारागृह कर्मचारी वर्ग -04 करिता | रु-10/- |

(सदरचे परिपत्रका प्रमाणे कारागृह अधिकारी / कर्मचारी यांचे जानेवारी-2025 च्या वेतनातुन क्रिडा निधी कपात करणेबाबत अंमलबजावणी करण्यात यावी.)

6/12/25

(प्रशांत बुरडे)
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

प्रति,

1.विशेष पोलीस महानिरीक्षक (का) छ.संभाजीनगर / नाशिक विभाग,नाशिक

2.कारागृह उपमहानिरीक्षक,पश्चिम विभाग,पुणे/पुर्व विभाग,नागपुर/दक्षिण विभाग,मुंबई

3.कारागृह अधीक्षक (सर्व) मध्यवर्ती / जिल्हा / खुले कारागृह / रत्नागिरी विशेष कारागृह / स्वतंत्रपुर खुली वसाहत

4.सर्व कक्ष अधिकारी ,अपोमस व कामनि कार्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-01